भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४४९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १५/०६/२०१७

**१) दारू पिण्याचे कारणावरून धापडबुक्याने मारहान करून घराला आग लावुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १२/०६/२०१७ चे १५.०० वा. दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीस दारू पिण्याकरीता पैसे मागीतले असता फिर्यादीने आरोपीला पैसे न दिल्याने त्यास धापड बुक्याने मारहान करून फिर्यादीचे घराला आग लावुन घर जाळल्याने अंदाजे १०,००० ते १२,०००/रु ची नुकसान केली. फिर्यादीची प्रकृती खराब असल्याने आज रोजी जावयासोबत पोस्टेला येवुन तोंडी रिपोर्ट दिल्याने पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४३६,३२३,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परसुरामकर पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) शेळी व पाट यांनी विषारी कुकुस खावुन मरण पावल्याने नुकसान झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १३/०६/२०१७ चे १६.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी दिलीस रामाजी भिवगडे वय ३७ वर्ष रा. कुसारी याचे मालकीची एक शेळी व एक पाट हे आरोपीच्या शेताजवळ चरण्यास गेले असता आरोपीने कुकुसामध्ये विषारी औषध टाकुण ठेवले होते ते कुकुस खाल्याने शेळी व पाट मरण पावुन फिर्यादीचे एकुण १२,०००/रु चे नुकसान केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे मोहाडी येथे कलम ४२९ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना चांदेवार पो. स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**३) वाहन सार्वजनीक ठिकाणी आमरोडवर थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या जिवीतास धोका निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १४/०६/२०१७ चे १९.३० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन आमरोडवर सार्वजनीक ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांना व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या ठिकाणी उभी करतांनी मिळुन आल्याने पोस्टे. भंडारा येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गायकवाड पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) अवैध देशी/जुगार दारु अडयावर धाडी . :–**

दिनांक १४/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे कारधा, गोबरवाही, साकोली व पवनी येथे अवैध देशी दारु/ जुगार अडयावर धाडी घालुन एकुण २० गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन २० लिटर हातभट्टी दारु किंमती १३००/–रु, २ लिटर ८८० मिली लिटर देशी दारू किंमती ८१६/–रु. तसेच जुगारातुन किंमती १८६०/–रु. असा एकुण किंमती ३९७६/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

**५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १४/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०३ तीन सिटर वाहनांवरती १८ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १०७ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.८८०५६५७६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.